भारती विदयापीठ पोलीस ठाणे,पुणे.
दिनांक:– २६/०२/२०१९

- प्रेसनोट –

पाच वर्षीपासुन फरारी असणारा आरोपी अटक.

---

दिंनाक.२५/०२/२०१९ रोजी भारती विदयापीठ पोलीस स्टेशनच्या हददीत पोलीस सहा.पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी व तपास पथकातील कर्मचारी हे पेट्रोलिंग करित असताना तपास पथकातील पोलीस कर्मचारी गणेश चिंचकर व अभिजीत जाधव यांना त्याच्या गुप्त बातमीदारा मार्फतीने बातमी मिळाली की, पाच वर्षीपुर्वी कात्रज चौकात पार्क असणाऱ्या ट्रक मधुन सोसायटी लिफ टी कंपनीच्या चहाचे बॉक्स चोरी केलेल्या आरोपी पैकी फरारी असणारा आरोपी गरिबाराम चौधरी हा उरुळी कांचन, पुणे येथे आला असल्याची माहिती प्राप्त झाली होती. मिळालेल्या बातमीप्रमाणे उरुळी कांचन येथे जावुन त्यास ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव पत्ता गरिबाराम हरीराम चौधरी, वय ३० वर्षे, रा. उरुळी कांचन पुणे असे सांगितले. तेव्हा त्यास पोलीस ठाणेस आणुन त्याच्याकडे गुन्हा केल्याबाबत तपास केला असता त्यांने गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. तेव्हा त्यास दि.२५/०२/२०१९ रोजी २०.०० वा अटक करण्यात आली आहे. त्यास मा न्यायालयाच्या समक्ष हजर करुन त्याची मा. न्यायालयाकडुन पोलीस कस्टडी घेवुन गुन्हयात जप्त करणे असलेला ७,९३,०८४/- रु कि. सोसायटी चहाचे बॉक्स बाबत अधिक तपास करीत आहोत.

सदर कामगिरी अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे मा.श्री रविंद्र सेनगावकर, परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री बच्चनसिंग, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री रविंद्र रसाळ यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विष्णु पवार, पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्री विष्णु ताम्हाणे, तसेच तपास पथकाचे सहा. पोलीस निरिक्षक श्रीशैल चिवडशेटटी, पोलीस कर्मचारी गणेश चिचंकर, अभिजीत जाधव, महेश मंडलीक, अभिजीत रत्नपारखी, कृष्णा बढे, कुंदन शिदे, सचिन पवार, राहुल तांबे, सर्फराज देशमुख, यांनी केलेली आहे.